. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर विषय समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) मुळ नियम 2007 आणि सुधारणा नियम 2008 (दिनांक 12 डिसेंबर 2008)

2. मा.विभागीय आयुक्त यांचे आदेश जा.क्र.2026/नपाप्र/निवडणूक/कावि-91, दि.13.03.2026

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21(1) व कलम 27(1) अन्वये.

जा.क्र./लाशमनपा/नसविसभा/03/2026
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
(नगरसचिव यांचे कार्यालय)
दिनांकः-16.03.2026

**प्रति,**
**श्री./श्रीमती** --------------------------

-----------------------------------------

सन्मा. सदस्य/सदस्या,
स्थायी समिती/परिवहन समिती,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

यादवारे आपणास कळविण्यात येते की, मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे संदर्भ क्र.2 चे आदेशानुसार लातूर शहर महानगरपालिकेची **स्थायी समिती सभापती व परिवहन समिती सभापती** निवड करणेसाठी विशेष सभा मंगळवार, **दि.24.03.2026** रोजी सकाळी 11.00 वाजेपासून **कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, महानगरपालिका लातूर** येथे मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आलेली आहे. सभेच्या कार्यपत्रिकेची सूचना खालीलप्रमाणे आहे.

तरी आपण सदरील विशेष सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**महापालिका सचिव,**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

# सभा सूचना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे), नियम 2007 व सुधारणा नियम 2008 नियम 2(2) अन्वये मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय यांचे आदेश क्र.2026/नपाप्र/निवडणूक/कावि-91 दि.13.03.2026 नुसार लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 नंतरची स्थायी समिती सभापती, परिवहन समिती सभापती निवडीची विशेष सभा मंगळवार दि.24.03.2026 रोजी सकाळी11.00 वाजता कै. यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी, लातूर हे राहतील. सदर सभेत खालील विषयावर विचार होईल.

**विषय क्र.19**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे), नियम 2007 व सुधारणा नियम 2008 मधील तरतूदीप्रमाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर तसेच त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी रिक्त होणा-या जागेवर स्थायी समितीच्या सभापतीची निवड करण्यासाठी महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी विशेष बैठकीचे आयोजन केले पाहिजे.

1) नमुना 1 मध्ये नामनिर्देशन, पालिका सचिवांकडे नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी/ तारखेस जातीने (समक्ष) सादर करील. प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव नमूद केलेले असेल व त्यावर एका पालिका सदस्याने सूचक म्हणून व दुस-याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असावी. कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराचे नामनिर्देशने सूचित किंवा त्यास अनुमोदक देणार नाही. परंतु स्थायी समिती सभापतीच्या नियुक्तीकरीता सूचक किंवा अनुमोदक असणा-या नगरसेवकास सभापतीपदासाठी निवडणूक लढविता येणार नाही. कोणत्याही उमेदवारास अथवा त्याचेवतीने चारपेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करता येणार नाहीत.

2) सभापती पदांची प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी, वैध उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे वाचून दाखविणे, उमेदवारी मागे घेणे, निवडणूक लढविणा-या वैध उमेदवारांची नावे घोषित करणे ही प्रक्रिया मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभेत होईल.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे), नियम 2007 मधील नियम 6(3) नुसार हात वर करुन मतांची नोंद होईल. ज्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची व ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्तात नोंदविण्यात येतील.

**निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | पद | नामनिर्देशनपत्रे वाटप दिनांक व वेळ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा दिनांक व वेळ | नामनिर्देशनपत्र दाखल करावयाचे अधिकारी व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | स्थायी समिती सभापती व परिवहन समिती सभापती | दि.17.03.2026 मंगळवार पासून स.11 ते 5 (कार्यालयीन वेळेत) | दि.20.03.2026 शुक्रवार स.11 ते 02 पर्यंत | महापालिका सचिव, महापालिका सचिव विभाग |

महापालिका सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर